| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **सीएनआर.क्र.एमएचबीयू-१५०००१०६२०२२** | दाखल दिनांक | : | ०१/०२/२०२२. | | |
| | नोंदणी दिनांक | : | ०१/०२/२०२२. | | |
| | निकाल दिनांक | : | १३/०४/२०२६. | | |
| | कालावधी | : | वर्षे | महिने | दिवस |
| | | | ०४ | ०२ | १२ |

**भाग-अ**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, देऊळगावराजा, ता. देऊळगावराजा, जि. बुलडाणा यांचे न्यायालयात

**(पिठासीन अधिकारी : श्री. एम. एस. भरड)**

**नियमीत फौजदारी खटला क्र.४६/२०२२.** **निशाणी क्र.७०.**

**देऊळगावराजा पोलिस ठाणे गु.र.नं.८/२०२२,**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | : | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत : पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस ठाणे देऊळगावराजा, ता. देऊळगावराजा,<br>जि. बुलडाणा. |
| अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ | : | श्री. ए.एस. शेळके |
| | | **विरुध्द** |
| आरोपीचे नाव, वय व पत्ता | : | **१. राहुल किसन जायभाये,**<br>वय २३ वर्षे, धंदा : मजुरी,<br>रा. देऊळगावमही, ता. देऊळगावराजा,<br>जि. बुलडाणा.<br>**२. नामदेव पंढरीनाथ बोंगाने,**<br>वय २० वर्षे, धंदा : मजुरी,<br>रा. धोत्रा नंदई, ता. देऊळगावराजा,<br>जि. बुलडाणा. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | : | श्री. एस.यु. नरोडे<br>श्री. पी.बी. घेवंदे. |

**भाग-ब**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | ०३/११/२०२१ |
| गुन्हा दाखल दिनांक | : | ०४/११/२०२१ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | : | ०१/०२/२०२२ |
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | : | ०५/०५/२०२२ |
| पुरावा सुरू केल्याचा दिनांक | : | ०५/०५/२०२२ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | : | ३१/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १३/०४/२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | : | – |

## आरोपीची सविस्तर माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | राहुल किसन जायभाये, | ०२.१२.२०२१ | आरोपी जेलमध्ये आहेत. | भा.दं.वि. कलम ३९२ सह कलम ३४ | निर्दोष | - | - |
| (२) | नामदेव पंढरीनाथ बोंगाने, | | | | | | |

## भाग-क
## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार / आरोपीतर्फे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

**अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार | शाबीत केलेले कागदपत्रे |
|---|---|---|---|
| १. | अमोल जर्नादन आढाव | जप्ती पंच | - |
| २. | दत्तात्रय आन्ना डोइफोडे | घटनास्थळ पंच | नि.क्र. १६ |
| ३. | श्रीकांत सुभाष भावसार | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | - |
| ४. | जर्नादन महादु मगर | घटनास्थळ पंच | - |
| ५. | देवानंद प्रकाश कायंदे | साक्षीदार | - |
| ६. | प्रिती अजय बोबडे | साक्षीदार | - |
| ७. | मो. रफीक मो. शफीक | जप्ती पंच | - |
| ८. | सुभाष ठमाजी भावसार | फिर्यादी | नि.क्र. ३५, ३६ |
| ९. | मोहम्मद खलील हाजी इस्माईल | साक्षीदार | नि.क्र. ४७ |

| | | | |
|---|---|---|---|
| | मुर्तीवाला | | |
| १०. | किरण काशीनाथ खाडे | दाखल तसेच तपास अधिकारी | नि.क्र. ५१ ते ६३. |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालयीन पुराव्यांची यादी**

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा**

| निशाणी क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|
| १६ | घटनास्थळ पंचनामा |
| ३५ | फिर्याद |
| ३६ | छापील फिर्याद |
| ४७ | गाडी खरेदी पावती |
| ५१ | मुद्देमाल पावती |
| ५२ | स्थानिक गुन्हे शाखा बुलडाणा यांना दिलेले पत्र |
| ५३ | पोलीस अधिक्षक बुलडाणा यांना दिलेले पत्र |
| ५४, ५५ | आरटीओ कार्यालय, जालना व बुलडाणा यांना संशयित मोटारसायकलबाबत केलेला पत्र व्यवहार |
| ५६ | गुन्ह्यात वापरलेल्या मोटारसायकलचा जप्ती पंचनामा |
| ५७ | मुद्देमाल पावती |
| ५८ | भारतीय पुरावा कायदा कलम २७ अन्वये केलेले निवेदन व पंचनामा |
| ५९ | मुद्देमाल पावती |
| ६० | प्लसर दुचाकी वाहनाचे कागदपत्रे व फोटो संदर्भात केलेला जप्ती पंचनामा |
| ६१ | पेन ड्राईव्ह |
| ६२ | कलम ६५(ब) अन्वये सादर केलेले प्रमाणपत्र |
| ६३ | मुद्देमाल पावती |

## ब. आरोपीतर्फे पुरावा

| निशाणी क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|
| | निरंक |

## क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|
| | निरंक |

## ड. मुद्देमाल

| अ. क्र. | मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | एम. आर. क्र. १२३/२०२१ | एक पाण्याचे नळीचा पोपटी रंगाचा पाईप अंदाजे दिड फुट लांबीचा व एक इंच गोलाईचा रबरी पाईप |
| २. | एम. आर. क्र. १/२०२२ | **१)** एक काळ्या रंगाची हिरो कंपनीची स्पेंलडर प्लस मोटार सायकल क्र. एमएच २८- बीडी-६४३०.<br>**२)** एक पोपटी रंगाची रबरी पाण्याचा पाईप एकुण लांबी ९ फुट ४ इंच असुन एक इंच गोलाईचा.<br>**३)** एक लोखंडी जुनी गुप्ती जिची लांबी १२ इंच असुन तिच्या पात्याची लांबी ७.५ इंच असुन रुंदी पाऊन इंच आहे जिला लाकडी व त्याचे वरुन लोखंडी मुठ असुन ३ इंच गोलाईची.<br>**४)** एक लोखंडी गज १८.५ इंच लांबीचा व १२ एमएम गोलाईचा.<br>**५)** एक सॅनडीस्क कंपनीचा ३२ जीबी चा पेन ड्राईव्ह ज्यावर cruzer bland असे लिहिलेले. |

## <u>न्यायनिर्णय</u>

(जाहीर दिनांक : १३/०४/२०२६ रोजी घोषीत)

आरोपीं हे भारतीय दंड विधान कलम ३९२ सह कलम ३४ प्रमाणे खटल्यास सामोरे जात आहे.

**<u>अभियोग पक्षातर्फे थोडक्यात हकीगत पुढीलप्रमाणे</u> :-**

**२.** सदर खटल्यात सुभाष ठमाजी भावसार हे फिर्यादी आहेत. त्यांनी अशा आशयाची फिर्याद दिली की, त्यांचा मुलगा नामे अमित सुभाष भावसार यांचे नावे त्यांचे चिखली रोड देउळगाव राजा येथे भावसार कापड विक्रीचे दुकान असुन सदरचे दुकान ते व त्यांची दोन मुले नामे अमित सुभाष भावसार आणि श्रीकांत सुभाष भावसार असे चालवितात. दिनांक ०३/११/२०२१ रोजी ते सर्व वरील कापडाचे दुकान सकाळी ०९.०० वा उघडले होते. दुकानामध्ये ते सर्व व त्यांचे २ मनुष्य ३ स्त्रीया कामगार असे दिवसभर

कापड विक्री केली. तसेच सदर कामाला मदत म्हणुन ०३ नातवंडे दुकानावर हजर होते. रात्री ०८.३० वाजेच्या सुमारास ते त्यांच्या दुकानातील ३ महीला कामगार नामे प्रिती बोबडे , शुभांगी लिपारे, गायत्री म्हेत्रे या त्यांच्या घरी निघुन गेल्या होत्या. त्यानंतर रात्री ०९.१५ वाजेच्या सुमारास दोन पुरुष कामगार देवानंद कायंदे व मनोज वाघमारे हे सनानिमित्त त्यांच्या घरी निघुन गेले. त्यानंतर दुकानामध्ये ते व त्यांचा मुलगा श्रीकांत भावसार असे दोघेच होते. त्यांनी त्या दिवसभराचे कापड विक्रीचे व मागील चार दिवसाच्या कापड विक्रीचे अंदाजे असे एकुण अंदाजे ४०००००/- ते ४५००००/- रुपये काऊंटरमधील गल्यामध्ये ठेवलेले होते.०९.४५ वाजेच्या सुमारास दोन अनोळखी इसम त्यांच्या दुकानात आले, तेव्हा त्यांच्या तोंडाला रुमाल बाधंलेले होते. तेव्हा त्यातील एका इसमाच्या हातात रॉड होता व दुस-या इसमाच्या हातात पोपटी रंगाचा प्लास्टीकाचा अंदाजे एक ते सव्वा फुट लांबीचा तुकडा होता. त्या इसमाने त्या पाईपमधुन लोखंडी गुप्ती काढुन, त्यांना दाखविली व "काऊंटरमधील सर्व पैसे काढुन द्या नाहीतर तुम्हा दोघांना जिवाने मारुन टाकील" अशी धमकी दिली. त्यामुळे ते घाबरुन त्यांचा मुलगा श्रीकांत याला म्हटले की, "काऊंटरमधील पैसे त्यांना देऊन टाक", तेव्हा श्रीकांत याने काऊंटरमधील दिवसभरातील झालेल्या कलेक्शनचे बांधुन ठेवलेल्या पैशाचे बंडल त्याला दिला. तेव्हा तो अनोळखी इसम म्हणाला की, "आणखीन पैसे दे" तेव्हा ते त्याला म्हणाले की, "आता पैसे नाही जेव्हड होते, तेव्हढे पैसे तुम्हाला दिले" असे म्हणाले असता, त्यातील गुप्ती दाखविलेला अनोळखी इसम आतमध्ये काऊंटरमध्ये आला व खुर्चीवर बसुन, त्याने गल्यात ठेवलेले त्यांचे चार दिवसांच्या कलेक्शनचे पैसे घेतले व त्याच्या खिश्यात ठेवले व ते दोघेजण दुकानाच्या बाहेर जाऊन, त्यांच्या मोटारसायकलवर बसुन निघुन गेले. त्यानंतर ते दोघे दुकानाच्या बाहेर येऊन आरडा-आरड केली. परंतु रात्री उशिर झाल्यामुळे तेथे कोणी लोक नव्हते. त्यामुळे ते दोघे चिखली रोडने पळुन गेले. ज्या अनोळखी इसमाच्या हातामध्ये गुप्ती होती. त्याचे वय अंदाज २० ते २५ वर्षादरम्यान होते. त्याने अंगामध्ये पिवळ्या रंगाचे जरकीन घातले होते. व ज्याच्या हातामध्ये रॉड होता. त्याचेपण वय अंदाजे २० ते २५ वर्षादरम्यान होते व त्याच्या अंगात काळसर रंगाचे जरकीन होते. करिता सदरील फिर्याद.

**३.** प्रस्तुत फिर्यादीवरुन **गु.र.नं.४६७/२०२१** अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला व पुढील तपास तपासी अधिकारी पोउपनि किरण खाडे, देऊळगावराजा पोलीस ठाणे यांचेकडे सुपुर्द करण्यात आला. तपासा दरम्यान त्यांनी दोन पंचासमक्ष घटनास्थळ/ जप्ती पंचनामा केला व वर नमुद मुद्देमाल जप्त केला. तसेच संबंधित साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली. आरोपींना अटक केली. तपासाअंती आरोपींविरुध्द गुन्हादर्शक तथ्य मिळून आल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान **कलम ३९२, सह कलम ३४** अन्वये **निशाणी-८** प्रमाणे आरोप निश्चित केले. सदर आरोप आरोपींना त्यांच्या भाषेमध्ये वाचुन दाखविले असता त्यांनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

**५.** उपलब्ध तोंडी व कागदोपत्री पुरावा आणि उभय पक्षाच्या विधीज्ञांचा मौखिक युक्तीवाद ऐकला, त्यावरुन खालील मुद्दे निश्चित करुन त्याचा निष्कर्ष कारणमिमांसावरुन

खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्ष असे सिध्द करतो का की, दि.०३/११/२०२१ रोजी २१.४५ वाजण्याचे सुमारास भावसार कापड दुकान, चिखली रोड, देऊळगावराजा, ता. देऊळगावराजा, जि. बुलडाणा आरोपींनी आपसात संगनमत करुन दुकानात शिरुन फिर्यादीस गुप्ती या प्राणघातक हत्याराचा धाक दाखवुन बळजबरीने त्यांच्या दुकानातील चार ते साडे चार लाख रुपये इतकी रक्कम घेऊन पळुन गेले का ? | **:** | **नकारार्थी.** |
| **२.** | अंतिम आदेश काय ? | **:** | **सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

**६.** आरोपींविरुध्दचे आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने **साक्षीदार क्र.१ – अमोल जर्नादन आढाव (जप्ती पंच), साक्षीदार क्र.२ – दत्तात्रय आन्ना डोइफोडे (घटनास्थळ पंच), साक्षीदार क्र.३ – श्रीकांत सुभाष भावसार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार), साक्षीदार क्र.४ –जर्नादन महादु मगर (घटनास्थळ पंच), साक्षीदार क्र.५ –देवानंद प्रकाश कायंदे (साक्षीदार), साक्षीदार क्र.६ –प्रिती अजय बोबडे (साक्षीदार) साक्षीदार क्र.७ –मो. रफीक मो. शफीक (जप्ती पंच), साक्षीदार क्र.८ –सुभाष ठमाजी भावसार (फिर्यादी) साक्षीदार क्र.९ –मोहम्मद खलील हाजी इस्माईल मुर्तीवाला (साक्षीदार)** आणि **साक्षीदार क्र.१० –किरण काशीनाथ खाडे (दाखल तसेच तपास अधिकारी)** यांना तपासले आहे. तसेच सरकार पक्षाच्या तोंडी विनंतीवरुन यापुढे कोणताही साक्षीदार तपासायचा नसल्याबाबत कळविल्याने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**७.** अभियोग पक्षाच्या साक्षीचे अवलोकन केले असता आरोपींविरुध्द गुन्हादर्शक तथ्य आढळून आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे जबाब नोंदविण्यात **नि.क्र. ६५ व ६६** अन्वये नोंदवण्यात आला असुन त्यांनी त्यातील सर्व बाबी नाकारल्या आहेत व त्यांना कोणताही इतर साक्षीदार तपासवयाचा नाही असे कथन केले आहे.

## युक्तीवाद

८. अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ श्री. ए.एस. शेळके यांनी युक्तीवाद केला आहे की, आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत करण्याकरिता अभियोग पक्षाने एकुण १० साक्षीदार तपासले असुन **सा.क्र. ८ यांनी नामे सुभाष ठमाजी भावसार** यांनी **नि.क्र. ३५ व ३६** अन्वये फिर्याद शाबीत केलेली असुन त्यांनी फिर्यादीप्रमाणे त्यांचा जबाब दिलेला आहे.

त्याप्रमाणे **सा.क्र. ३ नामे श्रीकांत सुभाष भावसार** यांनी **सा.क्र.** ८ यांच्या विधानांची पुरक असे विधान केलेले असुन त्यांनी देखिल घटनेबाबत विस्तृत असे विधान केलेले आहे. दोन्ही साक्षीदारांच्या जबाबामध्ये कोणतीही विसंगती मिळुन आलेली नाही. त्याचप्रमाणे अभियोग पक्षाने **सा.क्र. २ नामे दत्तात्रय अन्ना डोइफोडे** यांना तपासुन **नि.क्र. १६** अन्वये घटनास्थळ शाबीत केलेले आहे. त्याप्रमाणे अभियोग पक्षाने **सा.क्र. १० नामे किरण खाडे**, तपासी अंमलदार यांना तपासुन घटनेत वापरलेले हत्यार गुप्ती व लोखंडी रॉड तसेच गुन्हयामध्ये वापरलेली मोटारसायकल हे आरोपींकडुन जप्त करुन त्याचा **पंचनामा व मुद्देमाल पावती नि.क्र. ५६ ते ५९** वर शाबीत केलेले आहे. त्याप्रमाणे तपासी अंमलदार यांनी सदर चोरीच्या रक्कम मधुन आरोपी यांनी खरेदी केलेली प्लसरची कागदपत्रे जप्त करुन त्याचप्रमाणे ज्या व्यक्तीकडुन सदर गाडी खरेदी केली त्याची साक्ष नोंदवुन जप्त पंचनामा व मुद्देमाल पावती तयार केलेली आहे. एकंदरीत अभियोग पक्षाने गुन्हा शाबीत करण्याकरिता लागणारे महत्वाचे मुद्दे हे वाजवी शंकेपलीकडे शाबीत केलेले आहे. करिता, आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

९. याउलट, आरोपी क्र. १ व २ यांचे वकील विधीज्ञ श्री. एस.यु. नरोडे व श्री. पी.बी. घेवंदे यांनी युक्तीवाद केला आहे की, अभियोग पक्षांनी सादर केलेल्या १० साक्षीदारांच्या पुराव्यापैकी **सा.क्र. १ नामे अमोल आढाव**, **सा.क्र. ४ जर्नादन मगर, सा.क्र. ७ मोहम्मद रफीक मोहम्मद शफीक** जे जप्ती पंच म्हणुन अभियोग पक्षाने तपासलेले आहेत त्यांनी अभियोग पक्षास पुरक असे विधान केलेले नाही. त्यामुळे **सा.क्र. १० किरण खाडे**, तपासी अंमलदार यांनी जरी जप्ती पंचनामे शाबीत केले असतील तरी सदरील जप्ती पंचनाम्यावरील साक्षीदारांनी अभियोग पक्षास पुरक असे विधान न केल्याने सदरील सर्व जप्ती पंचनामे परिपोषक पुराव्या अभावी पुर्ण शाबीत झाले असे म्हणता येणार नाही. त्यामुळे, गुन्ह्यात जप्त केलेली गुप्ती, लोखंडी रॉड हे आरोपींकडुन जप्त केल्याबाबतची बाब पुर्णपणे शाबीत झालेली नाही. त्याप्रमाणे **सा.क्र. ५ देवानंद कायंदे व सा.क्र. ६ प्रिती बोबडे** यांची साक्ष पाहता सदरील साक्षीदार यांची माहीती ही ऐकीव स्वरुपाची असल्याने सदरील साक्ष अभियोग पक्षास पुरक होणार नाही. त्याचप्रमाणे, **सा.क्र. १० किरण खाडे, तपासी अंमलदार** यांनी त्यांच्या साक्षीमध्ये शाबीत केलेला घटनेच्या सिसीटीव्ही फुटेजचा पेन ड्राईव्ह याचा पंचनामा, ६५(ब) अन्वये दिलेले प्रमाणपत्र जरी शाबीत केलेले असतील परंतु न्यायालयामध्ये सदरील पेन ड्राईव्ह सर्वासमोर चालु करुन पाहिला असता त्यातील माहीती ही नष्ट झाल्याचे दिसुन आले आहेत. त्यामुळे, सदरील फुटेजमध्ये नेमके काय होते, त्याप्रमाणे सदरील फुटेजवर भिस्त ठेऊन तपासी अंमलदार यांनी गुन्ह्यात जप्त केलेली स्पेंन्डर दुचाकी वाहन हे तेच होते याबाबी शाबीत करण्यास अभियोग पक्ष असफल ठरला आहे. सदर गुन्हा हा पुर्णपणे शाबीत होण्याकरिता तथाकथीत घटनेमध्ये चोरी गेलेली रक्कम ही आरोपीच्या ताब्यात मिळुन येणे आवश्यक होते. परंतु, तपासी अंमलदार यांना सदर रक्कम आरोपीच्या ताब्यात मिळुन आल्याचे व सदर रक्कम जप्त केल्याचे कुठेही तपासात निष्पन्न झालेले नाही. त्याप्रमाणे, तपासी अंमलदार यांनी आरोपीतांनी पल्सर दुचाकी वाहन खरेदी केल्याबाबतचे खरेदीपत्र तसेच ज्या व्यक्तीमार्फत सदर दुचाकी खरेदी केली, त्या व्यक्तीची साक्ष नोंदवली आहे. परंतु, सदर प्लसर दुचाकी रक्कम ही आरोपीतांनी चोरीच्या रकमेतुन खरेदी केली होती हा निष्कर्षापर्यत तपासी अमंलदार कसे आले, याबाबत अभियोग

पक्षाने कोठेही स्पष्ठता दिलेली नाही. त्याचप्रमाणे, फिर्यादी व प्रत्यक्ष साक्षीदार यांनी त्यांच्या साक्षमध्ये आरोपींना पाहिल्यास ओळखु शकत नाही असे स्पष्टपणे नमुद केले आहे. त्यामुळे, तपासी अंमलदार यांचा पुरावा व शाबीत केलेली कागदपत्र याची बारकाईने अभ्यास करणे गरजेचे आहे. एकंदरित अभियोग पक्षाच्या संपुर्ण पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता फिर्यादी यांच्या दुकानावर चोरी झाली ही बाब दिसुन येते. परंतु, सदर चोरीमध्ये आरोपी यांचा हात आहे ही बाब संशयापलीकडे अभियोग पक्ष शाबीत करण्यास असमर्थ ठरला आहे. त्यामुळे, आरोपीतांची सदर गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

**<u>मुद्दा क्र.१ करीता</u> :-**

**१०.** अभियोग पक्षाने केलेले आरोप सिध्द करण्यासाठी आद्य जबाबदारी अभियोग पक्षाची असते. आपल्याकडे उपलब्ध असलेल्या पुराव्यातुन आरोपीवर केलेले आरोप सिध्द करणे अभियोग पक्षाचे साद्य असते. आरोप सिध्द करणे म्हणजे त्या गुन्ह्याचे आवश्यक घटक प्रस्थापित करणारे तथ्य पुराव्यातुन सिध्द करणे होय. अशा पुराव्याची सांगड घालताना अभियोग पक्षाला सर्वतोपरी काळजी घ्यावी लागते की, अशा पुराव्याच्या सादरीकरणातुन कोणताही वाजवी संशय निर्माण होणार नाही किंवा पुराव्यावर विश्वास ठेऊ नये अशी परिस्थिती उदभवणार नाही. पुराव्याचे निरीक्षण करताना हे लक्षात ठेवावे लागते की, जर निमार्ण होणारा संशय वाजवी असेल तर तो निश्चितच बचाव पक्षाला मदत करतो म्हणुन उपलब्ध पुराव्याचे बारकाईने परिनिरीक्षण होणे आवश्यक आहे.

११. आरोपी विरोधात आरोप केलेला गुन्हा सिध्द करण्यासाठी या चौकशीत अभियोग पक्षाला हे प्रस्थापित करावयाचे होते की, तथाकथीत दिवशी फिर्यादीच्या दुकानावर चोरी झाली, आरोपीतांनी गुप्ती प्राणघातक हत्यार व लोखंडी रॉड यांचा धाक दाखवुन सदर फिर्यादीकडुन आरोपीतांनी चार ते साडे चार लाख इतकी रक्कम बळजबरीने घेतली व तेथुन पळुन गेले.

१२. अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गून्हा शाबीत करण्याकरिता **सा.क्र. १ अमोल जर्नादन जाधव**, घटनास्थळ पंच, यांची नि.क्र. १४ वर, **सा.क्र. ४ जर्नादन महादु मगर, जप्ती पंच**, यांची **नि.क्र. १९** वर व **सा.क्र. ७ मोहम्मद रफीक मोहम्मद शफीक**, जप्ती पंच, यांची **नि.क्र. ३४** वर साक्ष नोंदवली आहे. सदरील पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या कथनास पृष्टी देणारे कथन केलेले नसुन त्यांनी त्यांच्या जबाबात पंचनाम्याबाबत कुठलेही महत्वाचे विधान केले नाही. सदरील साक्षीदार हे त्यांच्या पुर्वीच्या जबाबास मुखर झाल्याने त्यास उलट तपासाप्रमाणे प्रश्न विचारण्याची परवानगी सरकारी अभियोक्ताद्वारे मागण्यात आली. परवानगी दिली असता सदरील सक्षीदारांनी त्यांना विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली आहेत.

१३. **सा.क्र. ५ देवानंद प्रकाश कायंदे**, यांची **नि.क्र. २४** वरील व **सा.क्र. ६ प्रिती अजय बोबडे**, यांची **नि.क्र. ३१** वरील साक्षचे अवलोकन केले असता सदरील साक्षीदार हे प्रत्यक्ष साक्षीदार नसुन सदर घटनेबाबत त्यांची ऐकीव माहीती असल्याचे दिसुन येते.

त्यामुळे, सदरील साक्षीदारांचा पुरावा हा अभियोग पक्षास पुरक नसल्याचे दिसुन येते.

१४. दप्तरी आलेल्या इतर पुराव्यांचे विवेंचन करण्यापुर्वी अभियोग पक्षाच्या खटल्यानुसार घटना ही दिंनाक ०३/११/२०२१ रोजी घडली आहे. तसेच, घटनास्थळावरुन पोलीस स्टेशन हे १० मिनीटांच्या अंतरावर असल्याबाबतचे देखिल पुराव्यात आलेले आहे. असे असतांना घटनेबाबत प्रथम खबर दिनांक ०४/११/२०२१ रोजी दुपारी ०२.३० वाजता दिल्याचे दिसुन येते. त्यामुळे फिर्याद देण्यास जवळपास १४ तासांचा विलंब झालेला आहे. त्यामुळे, अभियोग पक्षाने सदरचा विलंब संयुक्तीक कारणाने स्पष्ट केला किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी त्याबाबत अवाक्षरही सांगितलेले नाही. परिणामी घटनेबाबत फिर्याद देण्यासाठी झालेला विलंब अभियोग पक्षाने संयुक्तीक कारणाने स्पष्ट केलेला नाही. त्यामुळे, सदरचा विलंब हा अभियोग पक्षाच्या खटल्यास बाधक आहे किंवा कसे हे पाहणे गरजेचे आहे.

१५. **सा.क्र. ८ सुभाष ठमाजी भावसार** हे घटनेतील फिर्यादी असुन त्यांनी **नि.क्र. ३४** वरील साक्षमध्ये म्हटले आहे की, त्यांचे कापड दुकान आहे, ते दुकान ते मदतनीस म्हणून व त्यांचे दोन मुले चालवितात. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, घटना ही दि. ०३.११.२०२१ रोजीची आहे, त्यादिवशी दुकानाची वेळ संपविली होती रात्रीचे नऊ सव्वा नऊ वाजले होते ते व त्यांचा मुलगा श्रीकांत दुकानात बसलेले होते दुकानाचे शेटर अर्ध झाकलेले होते, त्यावेळी दोन व्यक्ती दुकानात आल्या त्यांनी तोंडाला कापड बांधलेले होते. ते ग्राहक असतील आणि त्यांना दुकानातील खरेदी करावयाची आहे असे त्यांना वाटले, ते आत आल्यानंतर त्यांनी दोघांनी त्यांच्या जवळ असलेल्या हिरव्या पाईपमधुन गुप्ती काढली तर दुसऱ्याच्या हातात रॉड होता. त्यानंतर, त्यातील एकाने गुप्ती कॉऊन्टरवर आपटली व त्यांच्या मुलाला "पैसे काढा" असे म्हणाला. अन्यथा त्यांनी त्यांना मारुन टाकण्याची धमकी दिली. सदर आरोपीतांकडील गुप्ती व लोखंडी रॉड यांना **मटेरिअल ऑब्जेक्ट ए** व **मटेरिअल ऑब्जेक्ट बी** असे संबोधण्यात येत आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर हत्यारे आरोपींनी त्यांना दाखवुन त्यांच्याकडून पैशाची मागणी केली होती. त्यानंतर ते व त्यांचा मुलगा व त्यांचे नातेवाईक असे सर्वजण पोलीस स्टेशनला गेले व **नि.क्र. ३५** अन्वये लेखी फिर्याद व **नि.क्र. ३६** अन्वये छापील फिर्याद दाखल केली. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, आरोपीतांना पाहिल्यास ते ओळखु शकत नाही. परंतु, दोन्ही दाखविलेल्या आरोपीतांची शरीरयष्टी ही घटनेच्या दिवशीच्या आरोपीतांशी मिळती जुळती आहे.

१६. **सा.क्र. ३ नामे श्रीकांत सुभाष भावसार**, हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन त्यांनी **नि.क्र. १७** वर फिर्यादीच्या घटनेबाबतच्या पुराव्याशी सुसंगत विधाने केलेली आहे. सदर साक्षीदाराने देखिल आरोपींना पाहिल्यास ओळखु शकत नाही.

१७. **सा.क्र. २ दत्तात्रय अन्ना डोइफोडे**, घटनास्थळ पंच यांनी **नि.क्र. १५** वरील त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले आहे की, दिनांक ०४/११/२०२१ रोजी त्यांना घटनास्थळ पंचनाम्यासाठी बोलाविले होते, त्यांच्या समक्ष **नि.क्र. १६** वर पंचनामा तयार करुन त्यावर त्यांची स्वाक्षरी घेतली.

१८. अभियोग पक्षाने सादर केलेल्या वरील नमुद फिर्यादी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व पंच साक्षीदार यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता सदर घटनेच्या दिवशी चोरी झाल्याचे स्पष्टपणे दिसुन येते. परंतु, त्यांनी सदर आरोपीतांना पाहिल्यास ओळखु शकत नाही असे स्पष्टपणे मान्य केल्याने अभियोग पक्षाने सादर केलेला उर्वरित पुरावा हा आरोपीतांना घटनेस जोडतो किंवा कसे कसे ही बाब पाहण्याकरिता अभियोग पक्षाचा पुरावा हा बारकाईने पाहणे गरजेचे आहे.

१९. वरील बाब शाबीत करण्याकरिता अभियोग पक्षाने **सा.क्र. १० किरण खाडे, तपासी अंमलदार** यांना **नि.क्र ५०** वर तपासले आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, सदर गुन्हयाचा तपास मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळावर जावुन दोन पंचासमक्ष **नि.क्र. १६** अन्वये घटनास्थळ पंचनामा केला व सदरील घटनास्थळावरील दिड फुट लांबीचा पोपटी कलरचा एक पाण्याचा पाईप जप्त करुन **नि.क्र. ५१** अन्वये मुद्देमाल पावती तयार केली. त्याचप्रमाणे, त्यांनी आरोपींची नावे मिळण्याकरिता स्थानिक गुन्हे शाखा बुलडाणा यांना **नि.क्र. ५२** अन्वये पत्र दिले. तसेच,डम डाटा मिळण्याकरिता पोलीस अधिक्षक, बुलडाणा यांना **नि.क्र. ५३** अन्वये पत्र दिले. त्याप्रमाणे, सिसीटीव्ही फुटेजमध्ये आढळुन आलेल्या संशयित मोटारसायकलच्या क्रमांक मिळणेबाबत आरटीओ कार्यालय, जालना व बुलडाणा यांना **नि.क्र. ५४ व ५५** अन्वये पत्र दिले. त्यानंतर, मोटारसायकलच्या क्रमांकाची पुष्टी झाल्यानंतर आरोपींच्या घरी जावुन सदर काळ्या रंगाची मोटारसायकल जप्त करुन **नि.क्र. ५६** अन्वये जप्ती पंचनामा व **नि.क्र. ५७** अन्वये मुद्देमाल पावती तयार केली. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये पुढे असे कथन केले आहे की, तपासी अंमलदार यांनी पि.सी.आर. दरम्यान राहुल जायभाये यांना विचारपुस केल्यानंतर त्यांनी सदर चोरीमध्ये एक लाख पंचविस हजार इतकी रक्कम चोरी असुन त्यांनी त्याचे दुचाकी पल्सर घेतल्याचे सांगितल्यावरुन व सदर गुन्ह्यात वापरलेली एक लोखंडी गुप्ती व एक लोखंडी गज कुठे ठेवला याबाबत कलम २७ भारतीय पुरावा कायद्या अन्वये निवेदन दिले व त्यावरुन त्यांच्या ताब्यातुन वर नमुद मुद्देमाल जप्त करुन **नि.क्र. ५८** अन्वये व **नि.क्र. ५९** अन्वये मुद्देमाल पावती तयार करण्यात आली. त्यानंतर, सदर चोरीच्या रकमेतुन विकत घेतलेल्या पल्सर दुचाकीचे खरेदीचे कागदपत्रे जप्त करुन **नि.क्र. ६०** अन्वये जप्ती पंचनामा तयार केला. त्याचप्रमाणे सदर घटनास्थळाच्या बाजुला असलेल्या मल्लावत यांच्या दुकानातील सिसीटीव्हीची फुटेज पेन ड्राईव्हमध्ये घेऊन त्याचा नि.क्र. ६१ अन्वये जप्ती पंचनामा केला. त्याचप्रमाणे, त्या सिसीटीव्ही फुटेज चे कलम ६५(ब) अन्वये **नि.क्र. ६२** वर प्रमाणपत्र हस्तगत केले व जप्त केलेल्या पेन ड्राईव्हची **नि.क्र. ६३** अन्वये मुद्देमाल पावती तयार केली. त्यानंतर, तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे टिपण नोंदवुन ज्या व्यक्तीकडुन पल्सर दुचाकी खरेदी केली त्या व्यक्तीचे देखिल तपास टिपण नोंदविली आहे व तपासांती गुन्हासदृश्य तथ्य मिळुन आल्याने आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केलेले आहे.

२०. वरील नमुद पुराव्यांचे अवलोकन केले असता, जरी अभियोग पक्षाने गुन्ह्यात वापरलेला मुद्देमाल, दुचाकी हे आरोपींच्या ताब्यातुन जप्त करुन पंचनामा केल्याबाबतचे

म्हटले असलेतरी सदरील पंचनामे ज्या साक्षीदारांसमोर तयार करुन त्यावर त्यांची स्वाक्षरी घेतलेली आहे. त्यातील काही साक्षीदारांनी म्हणजेच सा.क्र. १, ४ व ७ यांनी अभियोग पक्षास पुरक असे विधान न केल्याने तसेच सदर पंचनाम्यावर त्यांची स्वाक्षरी पोलीस स्टेशनमध्ये घेतल्याबाबतचे नमुद केले आहे. सदर जप्ती ही आरोपींच्या ताब्यातुन केली होती ही बाब परिपोषक पुरावा अभावी स्वीकार करणे हे विधीग्राह्य होणार नाही. त्याचप्रमाणे, तपासी अंमलदार यांनी ज्या सिसीटीव्ही फुटेजवर भिस्त ठेवुन **नि.क्र. ५४,५५** अन्वये पत्र व्यवहार केला व सदर **नि.क्र. ६१, ६२ व ६३** अन्वये पेन ड्राईव्ह बाबतचा जप्ती पंचनामा, कलम ६५(ब) अन्वयेचे प्रमाणपत्र व मुद्देमाल पावती तयार केली. सदरील पेन ड्राईव्ह हा न्यायालयात चालविला असता त्यातील डेटा हा नष्ट झाल्याचे दिसुन आल्याने अभियोग पक्षाने ज्या आधारावर विसंबुन राहुन सदर तपास चालु करुन मोटारसायकलबाबतचा व्यवहार केला याबाबी बाबत प्रश्नचिन्ह निर्माण होते. त्याचप्रमाणे, सदर मोटारसायकल **नि.क्र. ५६ व नि.क्र. ५७** अन्वये ही आरोपीतांकडुन जप्त केल्याबाबतचे म्हटलेले आहे, त्यातील नमुद असलेल्या पंच साक्षीदारांनी देखिल अभियोग पक्षास पुरक असे विधान न केल्याने सदरील जप्ती ही आरोपीतांकडुन झाली होती ही बाब परिपोषक पुराव्या अभावी स्वीकारणे विधीग्राह्य होणार नाही. त्याप्रमाणे, अभिलेखावरील **नि.क्र. ५८** वरील कलम २७ भारतीय पुरावा कायदा अन्वये केलेल्या निवेदन पंचनामा व त्या अन्वये जप्ती केलेल्या पंचनाम्याचे व **नि.क्र. ५९** अन्वये केलेल्या मुद्देमाल पावतीचे व अभिलेखावरील अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरील पंचनाम्यातील व निवेदनावरील स्वाक्षरी केलेल्या पंच साक्षीदारांचा साक्ष नोंदविण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरलेले आहेत. त्यामुळे, परिपोषक पुराव्याअभावी सदर जप्ती झाली होती ही बाब स्वीकारणे विधीग्राह्य होणार नाही. त्याचप्रमाणे, अभियोग पक्ष तथा तपासी अंमलदार यांनी सदर घटनेतील चोरी केलेली चार ते साडे चार लाख इतकी रक्कम आरोपींच्या ताब्यात मिळुन आल्याचे कुठेच शाबीत करता आलेले नाही असे दिसुन येते.

**२१.** अभियोग पक्षाच्या कथनानुसार सदरील चोरी केलेल्या रकमेतुन आरोपीतांनी पल्सर दुचाकी घेतल्याबाबतचे नमुद करुन त्याबाबत त्यांनी **सा.क्र. ९ मोहम्मद खलील हाजी इस्माईल मुर्तीवाला** यांची **नि.क्र. ४६** वर साक्ष नोंदविलेली असुन त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये आरोपीतांनी त्यांच्याकडुन रक्कम रुपये ५६,०००/- मध्ये पल्सर दुचाकी खरेदी केली होती व सदरील खरेदीची प्रत व इतर कागदपत्रे हे **नि.क्र. ४७** अन्वये शाबीत केलेले आहेत. परंतु, तपासी अंमलदार यांच्या सरतपासाचे अवलोकन केले असता त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये सदर पल्सर दुचाकी ही १,२५,०००/- इतक्या किंमतीमध्ये विकत घेतल्याबाबतचे आरोपीतांनी त्यांच्यासमोर कबुल केल्याचे नमुद केले आहे. परंतु, तपासी अंमलदार यांनीच साक्ष घेतलेल्या वर नमुद साक्षीदाराने सदर पल्सर दुचाकीची खरेदी रक्कम ही ५६,०००/- रुपये असल्याबाबतचे नमुद केले आहे. त्यामुळे, अभियोग पक्षाच्या पुराव्यामध्येच विसंगती दिसुन येते. काही क्षणाकरिता सदर पल्सर दुचाकी खरेदी केल्याचे गृहित धरलेतरी अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता सदर रक्कम ही चोरीच्या रकमेमधील होती याबाबतची बाब अभियोग पक्षाच्या पुराव्यातुन शाबीत झाल्याचे कुठेही दिसुन येत नाही. त्यामुळे, तपासी अंमलदार यांनी सदर पल्सर ही चोरीच्या रक्कमेतुन घेतली आहे या निष्कर्षावर ते कसे पोहोचले याबाबत

कुठेही स्पष्टता दिसुन येत नाही. एकंदरित अभियोग पक्षाचा पुरावा आरोपीस गुन्ह्याशी जोडण्यास पुरेसा नसल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे, अभियोग पक्षाने दाखल केलेल्या पुराव्यातील विसंगतीमुळे निर्माण झालेली संशयाचा फायदा हा आरोपींस देणे संयुक्तीक होईल. एकंदरित तथाकथीत घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस गुप्ती या प्राणघातक हत्यार व लोखंडी रॉड यांचा धाक दाखवुन त्यांच्याकडुन चार ते साडे चार लाख इतकी रक्कम घेऊन ते तेथुन पळुन गेले ही बाब अभियोग पक्ष संशयापलीकडे शाबीत करण्यास असमर्थ ठरले. करीता, मी **मुद्दा क्र.१** चा निष्कर्ष **नकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करिता</u> :-**

२२. सदर गुन्ह्यात जप्त केलेली एक काळ्या रंगाची हिरो कंपनीची स्पेंल्डर प्लस मोटार सायकल क्र. एमएच २८- बीडी-६४३० चा तात्पुरता ताबा पुर्व पिठासिन अधिकारी यांच्या किरकोळ अर्ज क्र.१/२०२२ मधील आदेशान्वये ओम जायभाये यांना देण्यात आलेला आहे. सदरील ताबा अपिल कालावधीनंतर कायम करणे योग्य होईल. मुद्दा क्र.१ च्या **नकारार्थी** निष्कर्षाअंती मी **मुद्दा क्र.२** च्या निष्कर्षा दाखल पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| | **<u>आदेश</u>** |
|---|---|
| १) | आरोपी **१. राहुल किसन जायभाये** आणि **२.नामदेव पंढरीनाथ बोंगाने,** यांची **भारतीय दंड विधान कलम ३९२ सह कलम ३४** या गुन्ह्यातुन **फौजदारी प्रकिया संहिता कलम २४८(१)** अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २) | आरोपींची जामीनपत्रे व बंधपत्रे रद्द करण्यात येत आहेत. |
| ३) | या प्रकरणातील जप्त मुद्देमाल स्पेंल्डर प्लस मोटार सायकल क्र. एमएच २८- बीडी-६४३० चा ओम जायभाये यांना दिलेला तात्पुरता ताबा अपिल कालावधीनंतर कायम करण्यात येतो. |
| ४) | प्रकरणातील इतर जप्त मुद्देमाल १). एक पोपटी रंगाची रबरी पाण्याचा पाईप एकुण लांबी ९ फुट ४ इंच असुन एक इंच गोलाईचा २). एक लोखंडी गज १८.५ इंच लांबीचा व १२ एमएम गोलाईचा हे मुल्यहिन असल्याने अपिल कालावधीनंतर ते नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावे. तसेच ३). एक सॅनडीस्क कंपनीचा ३२ जीबी चा पेन ड्राईव्ह ज्यावर cruzer bland असे लिहिलेले हे खराब झालेले असल्याने अपिल कालावधीनंतर ते नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावे. ४).एक लोखंडी जुनी गुप्ती जिची लांबी १२ इंच असुन तिच्या पात्याची लांबी ७.५ इंच असुन रुंदी पाऊन इंच आहे जिला लाकडी व त्याचे वरुन लोखंडी मुठ असुन ३ इंच गोलाईची हिचा अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे लिलाव करुन त्यातील रक्कम सरकार जमा करावी. |
| ५) | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७(अ) अन्वये रक्कम रु.१५,०००/- चे प्रत्येकी वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र द्यावे. सदर बंधपत्र |

| | |
|---|---|
| | पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहतील. |
| (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित) | |

MAHESH SUNILDATT BHARAD
Digitally signed by MAHESH SUNILDATT BHARAD
Date: 2026.04.13 15:18:43 +0530

**(श्री. एम. एस. भरड)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोर्ट क्र.१,
देऊळगावराजा, जि. बुलडाणा.

दिनांक : १३/०४/२०२६.

**प्र मा ण प त्र**

“ मी याची पुष्टी करतो की, सदरील पीडीएफ फाईलमधील प्रत्येक शब्द नी शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे सारखेस आहेत.”

लघुलेखकाचे नाव :- श्री. रुपेश शोभा अशोक दांडगे,

न्यायालयाचे नाव :- प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. १, देऊळगावराजा.

न्यायनिर्णयाचा दिनांक :-१३.०४.२०२५

श्रुतलेखनाचा दिनांक :- १३.०४.२०२५

तपासलेले आणि स्वाक्षरी दिनांक :- १३.०४.२०२५

अपलोड केल्याचा दिनांक :- १३.०४.२०२५

स्वा/-

(श्री. रुपेश शोभा अशोक दांडगे,)

लघुलेखक.